# B.K. BIRLA CENTRE FOR EDUCATION

SARALA BIRLA GROUP OF SCHOOLS
A CBSE DAY-CUM-BOYS' RESIDENTIAL SCHOOL

## TERM-1 EXAMINATION (2026-27)

**MARATHI [SET-ONE]**

| | |
|---|---|
| Class : VIII | Duration: **3** Hrs |
| Date : 11.09.2026 | Max. Marks: **80** |
| Admission No.: | Roll No.: |

---

कृतिपत्रिकेसाठी सूचना :

(1) स्वच्छता, नीटनेटकेपणा व लेखननियमांनुसार लेखन यांकडे जाणीवपूर्वक लक्ष दयावे.

---

## विभाग – अ (वाचन व आकलन )

**प्र1 खालील अपठित उतारा वाचून दिलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा:–** **(5X1=5)**

वृक्ष जे त्यागाच्या भावनेने स्वतः उन्हात उभे राहतात, पण इतरांना सावली देतात. ज्यांची फळे–फुलेही दुस-यांसाठीच असतात,असे त्यागमय जीवन जगणारे वृक्ष एखादया सत्पुरुषासारखे भासतात. सामान्य माणूसही नेहमीच्या दगदगीपासून दूर जाण्यासाठी,हवापालटासाठी थंड हवेच्या ठिकाणी निसर्गाच्या सान्निध्यातच जातो. अशा या उपकारकर्त्या वृक्षांचा आज ऱ्हास होताना दिसत आहे. मानवाने बेसुमार जंगलतोड करून वैराण वाळवंटे निर्माण केली आहेत. मानवाचे पाऊल नि वाळवंटाची चाहूल अशी म्हण आहे,ती अगदीच त्याने सार्थ केली आहे. जळणासाठी आणि घरे बांधण्यासाठी बेसुमार वृक्षतोड केली.त्यामुळे उष्णता वाढली पावसाचे प्रमाण कमी झाले. दुष्काळाचे प्रमाण वाढले जमिनीची धूप होऊन ती नापीक झाली. परिणामी हवेच्या प्रदूषणासारख्या समस्यांना मानवाला तोंड दयावे लागले जंगलात माणूस जितकी कमीत कमी लुडबूड करेन तितके आपले चक्र दुरुस्त करण्याची निसर्गाला संधी मिळेल. जंगलतोड तर थांबलीच पाहिजेच पण त्याचबरोबर नवीन झाडेही लावली गेली पाहिजेत,जंगले वाढवली पाहिजेत. या सर्व गोष्टींचा विचार करून पर्यावरणाच्या संरक्षणासाठी आणि सर्व लोकांना जंगलाचे महत्त्व समाजावून सांगण्यासाठी प्रयत्न करणे फार महत्त्वाचे आहे

**(अ) दिलेल्या प्रश्नांची उत्तरे पर्यायामधून निवडा:–**

(1) वृक्षांची फळे–फुले कोणासाठी असतात ?

**अ** इतरांसाठी **ब** दुस-यांसाठी **क** स्वतःसाठी

(2) मानवाने जंगलतोड करून काय निर्माण केले ?

**अ** हवेचे प्रदूषण **ब** कमी पाऊस **क** वैराण वाळवंटे

(3) वृक्ष कोणत्या भावनेने उन्हात उभे राहतात?

**अ** स्वार्थाच्या **ब** त्यागाच्या **क** प्रेमाच्या

(4) त्यागमय जीवन जगणाऱ्या वृक्षांना लेखकाने कोणती उपमा दिली आहे?

अ सत्पुरूषाची ब महात्मा क वीराची

(5) मनुष्याने कोठे लुडबुड करणे थाबविले पाहिजे?

अ घरात ब शाळेत क जंगलात

**प्रश्न 2 :– (आकलन ) अपठित पद्यांश :–** **(5X1=5)**

प्रभातकाळी तुझी लागली ओढ मायबोली
भवती गुंजे तव गुणगानी मंगल भूपाळी
ज्ञानामृत गे तुला पाजिले संत ज्ञानदेवे
नाथ समर्थे तुझी फोडिली शब्दांची पेवे
भक्त तुका तव तार छेडिता जनमत आंदोळे
साथ कराया भोवती जमले संतांचे मेळे
शिवशाहीचे भाट वाहती तुला कुर्निसात
शृंगारावर वीररसाची झाली बरसात
चलन पटविती तुझे घोंगडे मर्द गावढाळ
किती ही मूस रांगडी तुझी टाकसाळ
रोखठोक हा नाद छणाने नित रानमोळी
भवती गुंजे तव गुणगाणी मंगल भूपाळी

(1) प्रभातकाळी कवीला कोणाची ओढ लागली आहे ?

**अ** कविता **ब** मायबोली **क** मराठी भाषा

(2) भाट या शब्दाचा अर्थ काय आहे ?

**अ** नोकर **ब** थाटमाट **क** स्तुतिपाठक

(3) भूपाळी केव्हा म्हटली जाते?

**अ** दुपारी **ब** प्रभातकाळी **क** कोणत्याही वेळी

(4) मायबोलीला ज्ञानामृत कोणी पाजले आहे ?

**अ** ज्ञानेश्वरांनी **ब** नामदेवाने **क** तुकारामाने

(5) तार कोण छेडत आहे?

**अ** रामदास **ब** समर्थ **क** तुकाराम

## खंड ख व्याकरण

**प्र 3 समानार्थी शब्द लिहा– ( कोणतेही दोन)** **(2X1=2)**

(1) उत्सव =

(2) दैवत =

(3) कठीण =

**प्र 4 विरुधार्थी शब्द – ( opposites ) ( कोणतेही दोन)** **(2X1=2)**

(1) आनंद x

(2) खूप x

(3) जिवंत x

**प्र 5 लिंग बदला – ( change the gender ) ( कोणतेही दोन)** **(2X1=2)**

(1) काका =

(2) पिता =

(3) गाय =

**प्रश्न 6 वचन बदला – (write the plural noun ) ( कोणतेही दोन)** **(2X1=2)**

(1) पंख =

(2) काठी =

(3) कविता =

**प्र 7 खाली प्रत्यय लावून नवीन शब्द बनवा –** **(2X1=2)**

(1) पुस्तका + खाली = (2) झाडा + खाली =

**प्र 8 खालील वाक्यातील सर्वनाम ओळखा :–** **(2X1=2)**

(1) मी आंबा खात आहे .

(2) मित्राने माझी अभ्यासात मदत केली.

**प्र 9 काळ ओळखा –** **(2X1=2)**

(1) गाडीचा दरवाजा बंद झाला.

(2) राम अभ्यास करीत आहे.

**प्र 10 खालील वाक्यातील क्रियापद ओळखा –** **(2X1=2)**

(1) गाडी वेगात जात आहे.

(2) राम आंबा खातो

## खंड ग साहित्य

**प्रश्न 11 कोण कोणास म्हणाले लिहा –** **(2X1=2)**

(1) परंतु तशी परवानगी आहे का ?

(2) तुला सकाळी सात वाजता गोळी घालून ठार करण्यात येईल.

**प्रश्न 12 खालील प्रश्नांची उत्तरे लिहा – ( कोणतेही सात )** **(7x2=14)**

(1) गोप्या गवतात का लपून बसला ?

(2) कोणास पाहून गोप्याच्या डोळयात अश्रू दाटून आले व का ?

(3) नेहमी कोणत्या गोष्टीचा शोध घ्यावा?

(4) गोप्याच्या गाईचे नाव काय होते?

(5) रामदासांनी आपल्या अभंगातून कोणती शिकवण दिली आहे?

(6) यश कशा शिवाय मिळत नाही ?

(7) आईला कोणती गोष्ट लाजिरवाणी वाटली ?

(8) साधुपुरूषाची भीक मागण्याची पद्धत कशी होती ?

(9) लेखकाचे वडील कुठे व का गेले होते ?

**प्र 13 पठित गदयांश –** **(5X1=5)**

इंग्रजांचे शिपाई घोडयावर स्वार होऊन आले. ते गोप्याच्या झोपडीत शिरले आणि त्या लहान मुलांना बेदम मारू लागले

त्या शिपायांनी सर्व घर शोधले पण गोप्या सापडला नाही. एकाने गाईला छडी मारली! एका शिपायाने गवतात काठी घातली तो तेथे गोप्या आढळला. मुर्दाड बेटे! चालले स्वराज्य स्थापायला ,ओढा त्याला, काढा फोडून बंडखोर! इंग्रज अधिकारी ओरडला. गोप्याला एका खास लॉकअपमध्ये ठेवण्यात आले . त्यात आणखी सहा माणसे होती.पाच पुरुष होते .एक स्त्री होती.

**प्रश्न** (1) शिपायांनी कोणाला छडी मारली ?

(2) शिपायाने कोठे काठी घातली ?

(3) इंग्रजांचे शिपाई कशावर स्वार होऊन आले ?

(4) दिलेल्या ओळी कोणत्या पाठातील आहेत?

(5) शिपाई कोणाला बेदम मारू लागले ?

**प्र 14 पठित पदयांश –** **(5X1=5)**

भारतमाते असा तिरंगा

हिमालयातून उंच चढो

स्फूर्तिगीत हे गातांना मज

सर्व दिशांची भूल पडो

त्यात सांगतो रंग केशरी

समृध्दीही हिरवा सांगे

शुभ्र धवलशी किर्ती घेऊनी

परंपरेचा ध्वज रंगे

1 दिलेल्या ओळी कोणत्या कवितेतील आहेत?

2 हिमालयाहून उंच काय वाढणार आहे?

3 हिरवा रंग काय सांगतो?

4 कोणते गीत गातांना सर्व दिशांची भूल पडणार आहे ?

5 कोणती किर्ती घेऊनी परंपरेचा ध्वज रंगणार आहे?

**प्र 15 जोडया लावा –** **(4X1=4)**

1 अशोक –गीत

2 विश्व – पथ

3 स्फूर्ती – शांती

4 प्रगती – चक्र

**प्र 16 रिकाम्या जागा भरा –** **(4X1=4)**

(1) एका बाबतीत मात्र तो––––– होता.

(2) आईने फार –––––– सोसली होती.

(3) सातही जणांनी ---- खणले.

(4) सर्वांची ----- तेजाने फुलली होती.

**प्रश्न 17 आपल्या आवडत्या मोबाईसाठी एक आकर्षक जाहीरात तयार करा –** **(1X5=5)**

**प्रश्न 18 निबंध लेखन :– ( कोणताही एक )** **(1X5=5)**

1 संत रामदास    2 निसर्ग आपला मित्र    3 मी पाहिलेला अपघात

**प्र 19 स्वपरिचय लिहा :– ( my self in marathi )** **(1X5=5)**

**प्र 20 :–पत्र लेखन –** **(1X5=5)**

आपल्या वाढदिवसाचे आमंत्रण देणारे पत्र मित्रास लिहा –

**किंवा**

ग्रंथालयासाठी पुस्तके मागवणारे पत्र मालती पुस्तक भंडार, चिंचवड, पुणे यांना लिहा–

**:::::::::::::::::::: समाप्त ::::::::::::::::::::::::**